महावितरण कंपनीला “मुख्यमंत्री सौर कृषि पंप योजना” अंतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी आदिवासी उपयोजनेंतर्गत अनुदान वितरित करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१९/प्र.क्र. ४४/ऊर्जा-७.
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: २५ मार्च, २०१९.

वाचा :-

१) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.सौरप्र-२०१४/प्र.क्र.२१९/ऊर्जा-७, दि.२७.०३.२०१५ व दिनांक १४.०६.२०१७
२) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.सौरप्र-२०१६/प्र.क्र.३१९/ऊर्जा-७, दि.०४.११.२०१६
३) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.सौरप्र-२०१८/प्र.क्र.४०१/ऊर्जा-७, दि.१५.११.२०१८
४) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे (पुर्व), मुंबई यांचे दिनांक १४ मार्च, २०१९ चे पत्र.
५) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक: अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. ०२ एप्रिल, २०१८.
६) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक: अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. २५ जानेवारी, २०१९
७) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक: अर्थसं-२०१९/प्र.क्र.४१/अर्थ-३, दि. ०८ मार्च, २०१९.
८) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक: अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३, दि. ०८ मार्च, २०१९.
९) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. बीयुडी-२०१८/प्र.क्र.१२/कार्यासन-६, दिनांक १६ मार्च, २०१९

प्रस्तावना :-

राज्य मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार “मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेबाबतच्या” शासन निर्णयानुसार आदिवासी विकास विभाग यांनी अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांकरीता लागणारा निधी हा आदिवासी उपयोजना मधून सन २०१८-१९ या वर्षाकरीता असणाऱ्या नियतव्ययाच्या रकमेतून अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांकरीता राज्य हिस्सा व लाभार्थी हिस्सा वगळून उर्वरीत निधी (यात लाभार्थ्यांच्या ५ टक्के हिस्सा व्यतिरिक्त ५ टक्के अतिरिक्त हिस्सा व पंपाची उर्वरीत रक्कम यांचा समावेश आहे) उपलब्ध करुन द्यावयाचा आहे. अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांकरीता त्यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या ५ टक्के लाभार्थी हिस्स्या व्यतिरिक्त द्यावा लागणारा हिस्सा रु. ४.०१३ कोटी व पंपाची उर्वरीत किंमत रु. ६४.२० कोटी व राज्य हिस्सा रू.८.०३ कोटी असे मिळून आदिवासी उपयोजना योजनेअंतर्गत रु. ७६.२४१ कोटी इतका निधी उपलब्ध करुन दयावयाचा आहे. त्यानुसार आदिवासी विकास विभागाने उपरोक्त संदर्भ क्र. ९ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभाग प्रमुख म्हणून प्रधान सचिव (उर्जा) उद्योग उर्जा व कामगार

विभाग यांना अर्थसंकल्पिय निधी वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर निधी अर्थसंकल्पिय निधी वितरण प्रणालीद्वारे नियंत्रक अधिकाऱ्यांमार्फत महावितरणला वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेबाबतच्या शासन निर्णयानुसार आदिवासी विकास विभागाने अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्याकरीता सन २०१८-१९ मध्ये लागणारा रुपये ७६. कोटी २४१निधी हा आदिवासी उपयोजना मधून प्रशासकीय विभाग प्रमुख म्हणून प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांना अर्थसंकल्पिय निधी वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन दिला आहे. तथापि, शासन निर्णय दिनांक १५.११.२०१८ नुसार २३३६ आदिवासी लाभार्थी उपलब्ध आहेत. त्यानुसार प्रत्यक्ष निविदेतील किंमत विचारात घेता सदर रक्कम रु. ४०.३६ कोटी येते. प्रत्यक्ष आदिवासी लाभार्थ्यांना देण्यात येणारा लाभ विचारात घेऊन वरील निधीतून रक्कम शिल्लक राहिल्यास ती परत करण्याच्या अटीवर सदर निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर निधी रु. ४०.३६ कोटी (रुपये चाळीस कोटी छत्तीस लक्ष फक्त) अर्थसंकल्पिय निधी वितरण प्रणालीद्वारे नियंत्रक अधिकाऱ्यांमार्फत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे (पुर्व), मुंबई यांना वितरीत करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर रक्कम अदा करण्यासाठी श्री. उ. द. वाळुंज, सह सचिव (ऊर्जा), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी व श्री. ना. रा. ढाणे, अवर सचिव, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर निधी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे (पुर्व), मुंबई यांच्या नावे अदा करण्यात यावा. सौर उर्जा कृषिपंप बसविण्याचा कार्यकम अंतर्गत विविध योजनेवरील खर्चाचा, उद्दिष्टे व प्रत्यक्ष साध्यता याबाबतच्या माहितीसह मासिक व त्रैमासिक अहवाल लगतच्या महिन्याच्या १० तारखेपर्यंत महावितरणने शासनास तसेच आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य नाशिक, आदिवासी विकास विभागास सादर करावा. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या निधीची रक्कम केवळ सौर उर्जा कृषिपंप बसविण्याचा कार्यकम अंतर्गत विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी केवळ अनुसूचीत जमातीच्या लाभार्थ्यांकरिता खर्च करण्यात येईल याची महावितरणने खातरजमा करावी.

४. सदर निधीच्या लेख्यासंबंधीची कागदपत्रे, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे (पुर्व), मुंबई.यांनी आवश्यक तेव्हा महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई यांच्याकडे तपासणीसाठी सादर करावीत.

५. याबाबतचा खर्च “मागणी क्रमांक-टी-५, २८१०, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, ७९६ जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजना (०१)(०१) " मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना " (१०० टक्के राज्यस्तर योजना) (कार्यक्रम) लेखाशिर्ष (२८१० ०९७४) ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेतर))” या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

६. सौर उर्जा कृषिपंप बसविण्याचा कार्यकम अंतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण यांना निधी वितरीत करतांना महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०१८ शासन परिपत्रक वित्त विभाग, क्रमांक: अर्थसं-२०१८ /प्र.क्र.६९ / अर्थ-३, दि. ०२ एप्रिल, २०१८ च्या परिशिष्टातील तपासणी सूचीमधील अ.क्र. ३ व ९ येथील अटींची व या परिपत्रकातील परिच्छेद क्र.७ मधील प्रत्येक अटीची पूर्तता होत असून, शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक: अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९ /अर्थ-३, दि. २५ जानेवारी, २०१९ मधील सूचनां, क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४१/अर्थ-३, दि. ०८ मार्च, २०१९ व क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४१/अर्थ-३, दि. ०८ मार्च, २०१९ नुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२५१५०१३५५११० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Nanasaheb Rajaram Dhane
Date: 2019.03.25 15:04:05 +05'30'

(ना. रा. ढाणे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे (पुर्व), मुंबई.
२. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा व अनुज्ञेयता /लेखा परीक्षा), मुंबई- ४०० ००१
३. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), नागपूर
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. आदिवासी विकास विभाग, कार्यासन-०३, ०६ व ०९, मंत्रालय, मुंबई-३२
६. वित्त विभाग, कार्यासन-व्यय-१६/अर्थ-१४, मंत्रालय, मुंबई-३२
७. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
८. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य नाशिक,
९. अवर सचिव (रोख/प्रशासन), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई.३२
१०. अवर सचिव (ऊर्जा-३), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११. निवड नस्ती, ऊर्जा-७